# अशोक कौतिक कोळी यांचे कादंबरी लेखन

**देवकर दत्तात्रय गोविंदराव**

अशोक कौतिक कोळी कवी, कथाकार, कादंबरीकार म्हणून परिचित आहे. प्रामुख्याने ग्रामीण जीवन त्यांनी आपल्या साहित्यातून मांडलेले आहे. खानदेशातील जामनेर तालुक्यातील सुनसगावात एका शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. व्यवसाय शेतीचा व पेश शिक्षकाचा असल्यामुळे ग्रामीण भागातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक जीवनाचा अभ्यासाने व अनुभवाने त्यांनी लेखन केलेले आहे. आतापर्यंत त्यांचे कुड, असूड, कडीबंदी हे कथासंग्रह, गावाकडच्या कविता हा कवितासंग्रह, छोटा कमांडो ही बाल कादंबरी आणि पाडा, कुंधा, रक्ताळलेल्या तुरी या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत.

प्रस्तुत लेखामध्ये त्यांच्या कुंधा आणि पाडा या दोन कादंबऱ्यांचा विचार केला आहे. अशोक कौतिक कोळी यांनी खानदेशातील ग्रामीण जीवनातील लेखनाचे विषय अक्षरबद्ध करतांना प्रामुख्याने कापूस आणि केळी उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न त्यांच्या साहित्यातून मांडलेले आहेत. केळी, कापूस ही महाराष्ट्रातील मुख्य नगदी पिके आहेत. शेतकरी मोठ्या प्रमाणात या पिकांची लागवड करतो. खूप मेहनतीने पिक पिकवतो परंतु निसर्गाचा लहरीपणा, मजुराची टंचाई, व्यापाऱ्याची अडवणूक सरकारचे शेती व शेतकऱ्यांविषयी असणारे उदासीन धोरण यामुळे शेतकरी हतबल होतो. परिस्थितीशी झुंजण्याचा तो प्रयत्नही करतो. परंतु तो अपयशी ठरतो व शेवटी आत्महत्येकडे वळतो. हे सर्व का घडत? याला जबाबदार कोण? या सर्व प्रश्नांचा मुळापासून शोध घेऊन अशोक कौतिक कोळी यावर उपायही सुचविले आहेत.

**कुंधा :**

या कादंबरीला दिलेले कुंधा हे शीर्षक प्रतीकात्मक आहे शेतात कुंधा नावाचे तन असते. पण हे तन इतर तनांसारखे साधारण नसते तर ते खूपच चिवट असते त्याची पाळेमुळे जमिनीत खोलवर रुजलेली असतात. म्हणून ते सहजा-सहजी नष्ट होत नाही. ते नष्ट कण्यासाठी शेतकऱ्याला खूप मेहनत घ्यावी लागते. मुळासह त्याचे निर्मुलन करावे लागते. अन्यथा त्याचा थोडा जरी लवलेश शिल्लक राहिला तर ते पुन्हा फोफावते म्हणून 'कुंधा' कादंबरी विषयी भा.ल. भोळे म्हणतात " बांधाकडून शेतीच्या मध्याकडे झपाट्याने धाव घेणारे आणि खोल-खोल मुळे जमिनीत रोवल्यामुळे सर्व पिकांची नाकेबंदी करणारे 'कुंधा' नामक तण शेतकऱ्याचा अत्यंत अंत पाहत असते. ते खोदून काढणे त्याचे सपशेल निर्मुलन करणे आणि ते पार जाळून नष्ट करणे हाच त्यावरचा एकमेव मार्ग असतो. कुंधा खोदल्यावर त्याजागी पिके तरारतात शेतीही तरते. पण आज मात्र स्थिती अशी झाली आहे. त्यामुळेच शेतीला अवकळा आली असून शेतकऱ्याची दैना झाली आहे. अशोक कौतिक कोळी यांची कुंधा कादंबरी शेतीला ग्रासणाऱ्या या भीषण संकटाचे स्वरूप किती आक्राळ-विक्राळ आहे हे सांगण्याचा प्रयत्न करणारी आहे."[१] (प्रिय रसिक पृ..क्र. ८)"

जीवनातही हीच रीत असते जे चांगले आहे ते भरपूर वाढावे निरोगी राहावे असे वाटत असेल तर त्याच्या वाटत अडथळा निर्माण करणारे त्याला आडवे येणारे जे असेल ते उपटून फेकावे लागते. त्याचे निर्मुलन करावे लागते. सज्जनाचे रक्षण करायचे असेल तर दुर्जनाचे निर्दालन करावे लागते हीच वागण्याची योग्य नीती होय ही नीती समजून न घेता तिचा विचार न कर्ता कोणी वागू लागला तर ते त्याच्या दृष्टीने हितकारक नाही. व्यक्तीच्या कुटुंबाच्या निकोष वाढीसाठी समाजातील अनिष्ट प्रवृत्ती उखडून टाकल्या तरच तो समाज खऱ्या अर्थाने उमलून फुलू शकतो हे कुंधा या तणाच्या उदाहरणावरून चांगले स्पष्ट होते.

अशोक कौतिक कोळी यांनी कुंधा या कादंबरीत मांडलेला आशय अत्यंत महत्वाचा आहे. कुंधा ही ग्रामीण कादंबरी जरी असली तरी कादंबरीत येणारा कुंधा फक्त ग्रामीण भागातच नाही. तर

शहरातही पहावयास मिळतो. प्रामाणिक, नीतिवान, चारित्र्यवान माणसाला हा कुंधा आज प्रत्येक दिवशी छळतो आहे. हा कुंधा का वाढतो? त्याला कोण खतपाणी घालते ? त्याचे स्वरूप नेमके कसे आहे? त्याची पाळेमुळे कुठे आहेत? मुळापासून कसा त्याचा नायनाट करता येईल? इत्यादी प्रश्नांच्या अंगाने लेखकाने या कादंबरीत लिहिले आहे.

देवरामबापू हा या कादंबरीचा नायक आहे. खानदानी शेतकरी असणाऱ्या देवरामबापूचे गुरे, बैल, शेतीवर जीवापाड प्रेम असते. पत्नी, तीन मुले असनाऱ्या संसाराला कादंबरीच्या उत्तरार्धात ग्रहण लागते. सुरेश वाईट संगतीला लागून व्यसनी होतो. नामू बैल विकून टपरी टाकतो. कुटुंबात कलह निर्माण होतो. निसर्ग साथ देत नाही. गावातील राजकारण विकासाला आडवे येते. एकेकाळी वतनदार असणरा सत्ता, संपत्ती, वैभव संपन्न घराण्याचा वारसा असणारा देवरामबापू आपल्याच घरात आणि गावात उपरा होतो. सतत मानसिक गर्तेत सापडतो. अन्न-पाण्याला महाग होतो. गावात त्याची पत-प्रतिष्ठा राहत नाही. या सर्व गोष्टींचा मानसिक आघात होऊन शेवटी वेडा होतो.

ग्रामीण वास्तव मांडतांना शेतमजुरीची समस्या, मानवी स्वभाव, कौटुंबिक ताणताणाव, खेडे आणि शहरातील वाढणारे अंतर शेतीचे भविष्य, अज्ञान इत्यादी ग्रामीण वास्तव प्रकट होते.

**पाडा:**

आपल्या देशात जिरायती आणि बागायती अशा दोन प्रकारे शेती केली जाते. बागायती शेतीमध्ये केळी, ऊस, मोसंबी, द्राक्षे, इत्यादी पिके घेतली जातात. बागायती शेती करणारा शेतकरी लोकांना खूप सधन वाटतो. परंतु वरून हिरवेगार दिसणाऱ्या पिकामागचे काळेभोर वास्तव लोकांना दिसत नाही. हे वास्तव अशोक कौतिक कोळी यांनी खानदेशातील केळी उत्पादक शेतकऱ्याची व्यथा पाडा या कादंबरीतून मांडलेली आहे.

पाडा म्हणजे केळीच्या बागेचा घड 'झाडावर पिकण्याच्या थोडे आधी केली परिपक्व झाल्यानंतर उतरावयाचे आणि बाजारात विकण्यासाठी न्यावयाचे हे उतरणे म्हणजे पाडा'

चांगदेव तापीकर हा या कादंबरीचा नायक आहे. त्यांना सुनिता आणि कैलास हे दोन अपत्य आहेत, पत्नी कमलाबाई अस चार जनाच छोट कुटुंब आहे. शिवाय घरात पाळलेली मांजर, पोपट, बैलजोडी म्हैस, शेतात केळीचे पिक हा चांगदेव तापिकरचा गोतावळा, त्यांनतर बहिण, भाचा बायकोचा भाऊ, गावातील भावकी हे नातेवाईक त्याचबरोबर समाज सहकारी सोसायट्या, निवडणुका राजकारण, शेतकऱ्यांचे आंदोलन, दलाल, व्यापारी असे त्याच्या जीवनाला व्यापणारे दुसरे वर्तुळ आहे.

चांगदेवची मुलगी सुनिता हिच्या लग्नाच्या सोयरिकीपासून कादंबरीची सुरुवात होते. मुलीला पाहायला पाहुणे येतात. लग्न जुळते हुंड्याची रक्कम न झेपणारी असूनही मुलीच्या कल्याणासाठी चांगदेव होकार देतो. पण पुढे पैशाची व्यवस्था न झाल्यामुळे लग्न मोडते. मग स्वतःच्या बहिणीच्या मुलीला मुलगी देण्याचे ठरते. त्यासाठी जावयाला नोकरी लागतांना चांगदेवने पैसे भरावेत अशी आट घातली जाते.

सुनीताच्या लग्नासाठी चांगदेव फ्रुटसेल सोसायटीमधून एक लाख रुपायचे कर्ज घेतो. अगोदरच आजारी असणाऱ्या कमळाबाईचा आजार वाढत जातो. तिला दवाखान्यात दाखल केले जाते. तिथे जनसेवा हीच ईश्वरसेवेच्या नावाखाली लुटणारे डॉक्टर पैशाशिवाय विलाज करायला तयार नसतात. तर याचवेळी इकडे मुलाच्या नोकरीसाठी बहिण चांगदेवकडे पैशाची मागणी करते. घरात पैसे नाहीत शेतात पाडा आहे. पण त्यावा भाव नाही. तो शेतकऱ्यांना एकत्र करून आंदोलन करतो. परंतु मुर्दाड शासन प्रशासनाला याची दखल घेत नाही. पैसे कसे जमवायचे याचा तो विचार करतो. अशावेळी म्हैस विकण्याचा विचार त्याच्या मनात येतो. शेतात जातो तर म्हैस मरून पडलेली असते. मग तो औताचे बैल विकून पैसे घेऊन दवाखान्यात पोहचतो. परंतु त्या अगोदरच कमळाचा मृत्यू झालेला असतो. ते पैसे कमळाच्या अंत्यविधीसाठी खर्च होतात. इकडे बहिण पैशाचा तगादा लावते. चांगदेवला शेतीतील पाडा विकायचा असतो. परंतु राजकीय नेते चांगदेव आपला एकनिष्ठ कार्यकर्ता असूनही राजकीय फायद्यासाठी विरोध पक्षाचा रमेश तापिकाराच्या शेतात जातात. चांगदेव या

चुकीच्या गोष्टीला विरोध करतो तेव्हा पोलीस सरकारी कामात अडथळा आणला म्हणून चांगदेवला विरोध करतात. त्यानंतर थेट सुनीताच्या जळून मृत्यू झाल्याची बातमी येते आणि येथे कादंबरी संपते.

या कादंबरी विषयी ज्येष्ठ कादंबरीकार व समीक्षक रंगनाथ पठारे म्हणतात "अशोक कौतिक कोळी यांची ही पहिलीच कादंबरी आहे. रचनेच्या काही किरकोळ दोषांना पोटात घेऊनही त्यांनी जे वास्तव उभ केलय वाचतांना जो दाह ते आपल्यापर्यंत पोहोचतात तो अधिक प्रभावी आहे. ज्या वास्तवाकडे त्यांना आपल लक्ष वेधायचं आहे, त्यात ते खासच यशस्वी होतात. आणि हेच सगळ्यात महत्वाच आहे. कोणत्याही लेखकाची मातब्बरी यातच असते. एरवी दोष कुठही दाखवता येतच असतात" [२].

अशोक कौतिक कोळी यांनी त्यांच्या कादंबरी वाङ्मयातून ग्रामीण जीवन रेखाटतांना ते केवळ दु:ख,दारिद्र्य, प्रश्न मांडत नाहीत तर ते प्रश्न का निर्माण होतात याची कारणमिमांसा करून त्यावर उपायही सुचवतात हे त्यांच्या लेखणीचे वैशिष्ट सांगता येईल. कुंधा आणि पाडा या दोन्ही कादंबरीसाठी त्यांनी 'तावडी' बोली भाषेचा वापर केला आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१) प्रिय रसिक प्र.क्र.८

२) पठारे रंगनाथ – आमची कादंबरी : नोंदी आणि निरीक्षणे, शब्दालय प्रकाशन, प्र.आ. २०१४